## नि.दि.दा.क्र.४६६/२०२३ मध्ये निशाणी १८ वरील आदेश

प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी २ व ३ यांनी त्यांना दाव्यास कैफियत देण्यास झालेला विलंब माफीसाठी व कैफियत अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे कागदपत्रांची वेळेत पुर्तता न केल्यामूळे ऊशीर झाला आहे व  कैफियत मुदतीत देणे शक्य झाले नाही.

२. वादी यांनी प्रस्तूत अर्जाखाली म्हणणे दाखल करुन अर्ज मंजूर होण्यास विरोध दर्शविला आहे. वादीचे कथन की, अर्ज खोटा असून, विलंबाचे कारण नमूद नाही, असे आक्षेप नोंदविण्यात आले.

३. दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी विरुध्द विना कैफियतीचा आदेश पारीत झालेला नाही. परंतू प्रतिवादीना त्यांची कैफियत व म्हणणे दाखल करण्यास विलंब झाल्याचे दिसून येत आहे. दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यासाठी तसेच भविष्यात दाव्यात गुंतागुंत टाळण्यासाठी प्रतिवादींना त्यांची कैफियत दाखल करण्याची परवानगी देणे आवश्यक आहे. झालेल्या विलंबासाठी भरपाई म्हणून प्रतिवादी वर कॉस्ट लादणे उचीत होणार आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### -:: आदेश ::-

१. अर्ज रुपये २००/- कॉस्ट वादी यांना पुढील तारखेस देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. कॉस्टीची रक्कम दिल्यानंतर प्रतिवादीं क्र.२ व ३ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो व त्यांना कैफियत अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2024.02.29 12:08:46 +0530

दिनांक  २८.०२.२०२४.                (एम.आर.कामत)

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पंढरपूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment / Order.

| | | |
|---|---|---|
| Court | : | Jt. C. J. J. D. Pandharpur. |
| Name of Stenographer | : | R.M.Gogi. |
| Date | : | 28/02/2024. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 28/02/2024. |